# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## - घोषणा -

**राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१६- काही प्रश्नांमध्ये कथित साम्य- वस्तुस्थिती**

आयोगातर्फे दिनांक १० एप्रिल,२०१६ रोजी घेण्यात आलेल्या राज्य सेवा (पुर्व),२०१६ संदर्भात एका वृत्तपत्रात दिनांक २१ एप्रिल,२०१६ रोजी प्रसिध्द झालेला "राज्य सेवा आयोग आणि खाजगी संस्थांचा "प्रश्नयोग" या बातमीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे वस्तुस्थिती सर्व उमेदवारांना विदित करण्यात येत आहे.

एका उमेदवाराने आयोगाकडे उपरोक्त परीक्षेतील काही प्रश्न (१६) व खाजगी कोचिंग क्लासच्या सरावात वापरलेल्या प्रश्नात साम्य असल्याची त्रोटक तक्रार आयोगाकडे केली होती. आयोगाने त्याचा तपशील मागितल्यानंतर तक्रारदाराने १२ प्रश्न पाठविले. आयोगाने त्याची तपासणी केली असता ११ प्रश्नांमध्ये काहीही साम्य नसल्याचे आढळले. एका प्रश्नामध्ये प्रश्नाचा विषय व काही शब्दांमध्ये साम्य आढळले. मात्र प्रश्नाचा आशय व पर्यायांचा क्रम यामध्ये साधर्म्य नसल्याचे आढळले. म्हणजेच उमेदवारांच्या तक्रारित तथ्य नाही हे स्पष्ट होते. याचाच अर्थ उमेदवारांनी आयोगाकडे तक्रार करताना किंवा सदर वर्तमानपत्राने याबाबत बातमी प्रसिध्द करताना वस्तुस्थिती /सत्यता पडताळली नाही हे स्पष्ट होते. उमेदवारांनी याची कृपया नोंद घ्यावी तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २७ एप्रिल,२०१६**

**शुभांगी परब**
**उप सचिव (गोपनीय),**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**